I.I.F.-I (एकीकृत अन्वेषणफॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)

## प्रथम खबर अहवाल

(बी एन एस एस संहिताच्या कलम 173 अन्वये)

1. **District (जिल्हा):** अहिल्यानगर **P.S. (पोलीस ठाणे):** अहिल्यानगर कॅम्प पोलीस ठाणे **Year (वर्ष):** 2025

**FIR No. (प्रथम खबर क्र.):** 0355 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 17/06/2025 23:24 वाजता

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7A |

3. (a) **Occurrence of offence(गुन्हयाची घटना):**

1 **Day (दिवस):** मधले दिवस **Date from (दिनांक पासून):** 10/06/2025 **Date To (दिनांक पर्यंत):** 17/06/2025

**Time Period (कालावधी):** **Time From (वेळेपासून):** 17:00 तास **Time To (वेळेपर्यंत):** 12:34 तास

(b) **Information received at P.S. (पोलीस ठाण्यावर माहिती मिळाल्याचा):** **Date (दिनांक):** 17/06/2025 **Time (वेळ):** 20:30 तास

(c) **General Diary Reference (ठाणे दैनंदिनी संदर्भ):** **Entry No. (नोंद क्र.):** 044 **Date and Time (दिनांक आणि वेळ):** 17/06/2025 23:15 तास

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1. **(a) Direction and distance from P.S. (पोलिस ठाण्या पासून दिशा आणि अंतर):** पूर्व, 2 कि.मी. **Beat No. (बीट क्र.):**

**(b) Address (पत्ता):** पाथर्डी रोड येथील श्रेया सिमेंट,एजन्सीचे समोर झाडाखाली

**(c) In case, outside the limit of this Police Station, then Name of P.S. (पोलीस ठाण्याच्या हद्दी बाहेर असल्यास, पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (State) (जिल्हा (राज्य)):** (महाराष्ट्र)

6. Complainant / Informant (तक्रारदार / माहिती देणारा):

(a) Name (नाव): सुशिल सुखबिर लोट

(b) Father's/Husband's Name (वडिलांचे/पतीचे नाव):

(c) Date/Year of Birth (जन्मतारीख / वर्ष): 1983

(d) Nationality (राष्ट्रीयत्व):भारत

(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):

(f) Passport No. (पारपत्र क्र.):

Date of Issue (दिल्याची तारीख ): Place of Issue (दिल्याचे ठिकाण):

(g) ID Details (Ration Card, Voter ID Card, Passport, UID No., Driving License, PAN) (ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पैन कार्ड))

| S. No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्र क्रमांक) |
|---|---|---|

(h) Occupation (व्यवसाय):

(i) Address (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्ता प्रकार) | Address (पत्ता):: |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | डोके शाळेच्यामागे, महेशनगर, अह, अहिल्यानगर कॅम्प पोलीस ठाणे, अहिल्यानगर, महाराष्ट्र, भारत |
| 2 | स्थायी पता | डोके शाळेच्यामागे, महेशनगर, अह, अहिल्यानगर कॅम्प पोलीस ठाणे, अहिल्यानगर, महाराष्ट्र, भारत |

(j) Phone number (फोन नं.):

Mobile (मोबाइल क्र.): 91-9637557771

7. **Details of known / suspected / unknown accused with full particulars (ज्ञात / संशयित / अज्ञात आरोपींचे संपूर्ण तपशील):**

Accused More Than (अज्ञात आरोपी एका पेक्षा जास्त असतील तर संख्या): 0

| S. No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address(वर्तमान (पत्ता)) |
|---|---|---|---|---|
| 1 | जहिर अहमद इकबाल मुलाणी | | | 1. एकनाथ नगर,रहेमानिया मस्जीद जव,Town/Village (शहर / गाव): नेप्ती रोड,केडगाव जि अहिल्या,Tehsil (तहसील): Police Station (पोलीस ठाणे): अहिल्यानगर कॅम्प पोलीस ठाणे,District (जिल्हा): अहिल्यानगर,State (राज्य): महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant / informant ( तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे ):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S. No. (अ.क्र.) | Propertty Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (विवरण) | Value(In Rs/-) मुल्य (रु. मध्ये) |
|---|---|---|---|---|
| | | | | |

10. **Total value of property (In Rs/-) मालमतेचे एकूण मुल्य (रु. मध्ये) :**

11. **Inquest Report / U.D. case No., if any (मरणान्वेषण अहवाल/अकस्मात मृत्यू प्रकरण क्र. जर असल्यास):**

| S. No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.) |
|---|---|

12. **First Information contents (प्रथम खबर हकिगत):**

फिर्याद दि. 17/06/2025

मी सुशिल सुखबिर लोट, वय-42, धंदा-नोकरी, डी.एम.आर., एसीसी ॲण्ड एस., केन्द्रीय कर्मचारी. रो-डोके शाळेच्यामागे, महेशनगर, अहिल्यानगर. मो.क्र.9637557771

समक्ष हजर होवुन तक्रार लिहुन देतो कि, मी वरील पत्त्यावर कुटुंबासह राहतो व डी.एम.आर., एसीसी ॲण्ड एस. येथे धोबी कर्मचारी असुन त्यातुन मिळाणा-यावर पगारावर माझ्या परिवाराचा उदरनिर्वाह करतो.

माझे सर्वे नं. 215/1/216/1 येथे घर नं. 27 महेशनगर, डोके शाळेच्या मागे रो-बंगलो असुन तेथे मी सन 2017 साली पिरामल फायनान्स/डी.एच.एफ.एल. या बँके कडुन 14,92,471/-रू. गृहकर्ज घेवुन खरेदी केले होते. त्या गृहकर्जाचे मी सन 2022 पर्यत नियमित हप्ते भरले होते. सन 2022 साली मी माझे कौटुंबीक कारणास्तव मी बँकेकडुन घेतलेल्या गृहकर्जाचे हप्ते भरू शकलो नाही. तेव्हा मला बँकेने माझे घराची जप्तीची नोटीस पाठविली होती. त्या नोटीसचे मी काहीही उत्तर दिले नाही. त्यानंतर मला दिड वर्षानी मंडळ अधिकारी, भिंगार कार्यालय, अहिल्यानगर यांचेकडुन दि.13/05/2025 ला नोटीस मिळाली होती त्यात माझे घर ताबा देणे कामी दि.11/06/2025 ला समक्ष उपस्थित रहावे असे लिहीले होते.

दि.10/06/2025 रोजी मला संध्याकाळी माझे घराचे जप्ती करणारे सहुरा ऐजेंसी चे कर्मचारी जहीर मुलाणी यांचा फोन आला. त्यांनी मला सांगितले की उदया तुमच्या घरावर ताबा घ्यायला येणार आहे. जर तुम्हाला घराचा ताबा घेण्याची तारीख वाढवायची असेल तर तुम्हाला मंडळ अधिकारी दळवी मॅडम यांना 20,000/-रू दयावे लागतील. तेव्हाच ते तुमच्या घराचे जप्तीची तारीख वाढवुन देतील. तुम्ही या मी तुमची दळवी मॅडम सोबत भेट घालुन देतो. तेव्हा मी त्यांना सांगितले की, आता माझे कडे पैसे नाहीत मी तुम्हाला नंतर भेटतो असे म्हणुन मी त्यांना टाळले.

तेव्हा मला समजले की, सहुरा ऐजेंसी चा कर्मचारी जहीर मुलाणी हा माझे घराचे जप्तीची तारीख मंडळ अधिकारी दळवी मॅडम यांचेकडुन वाढवुन देण्याच्या निमीत्ताने माझेकडे लाच मागत आहे. तेव्हा मी ॲन्टी करप्शन, नाशिक येथे दिनांक 11/6/2025 रोजी गेलो व तेथे माझेकडे एक सरकारी व्यक्ती पैशाची मागणी करत असल्याबाबत सांगितले, त्यावेळी तेथे श्री.संतोष पैलकर साहेब यांना मी दिनांक 12/6/2025 रोजी अहिल्यानगर येथे येण्याबाबत सांगुन त्यावेळी मी सविस्तर तक्रार देईल असे सांगितले.

त्यानंतर दिनांक 12/6/2025 रोजी श्री. संतोष पैलकर साहेब यांचा मला फोन आला त्यावेळी मी त्यांना अहिल्यानगर येथे करिअप्पा चौक येथील मोकळया जागी येण्याबाबत सांगितले. त्यावेळी श्री.पैलकर साहेब आणि टिम तेथे आली. त्यावेळी मी दिनांक 12/6/2025 रोजीची तक्रार दिली.

त्यानंतर पैलकर साहेबांनी मी दिलेल्या तक्रारीप्रमाणे सहुरा एजन्सीचे कर्मचारी श्री.जहिर मुलाणी व मंडळ अधिकारी श्रीमती दळवी मॅडम हे माझेकडे लाचेची मागणी करतात अगर कसे? याची पडताळणी करणेकामी मला व पैलकर साहेबांनी सोबत आणलेले पंच श्री.निकम अशांना पडताळणी कारवाईकामी आवश्यक सुचना देवनु व्हॉईस रेकॉर्डर चालु करून देवुन अहिल्यानगर येथील करिअप्पा चौक येथील मोकळया जागेतुन माझे घराजवळ सहुरा एजन्सीचे कर्मचारी मुलाणी यांचे भेटीकरिता साधारण दुपारी 01/59 वाजेचे दरम्यान माझेकडील दुचाकी वाहन क्र. एम.एच.16 सी.यु. 6188 ने रवाना केले. त्याप्रमाणे मी व पंच श्री.निकम असे माझे घराजवळ गेलो त्यावेळी सहुरा एजन्सीचे श्री.जहिर मुलाणी व माझी कामासंबंधाने चर्चा झाली. त्यावेळी श्री.जहिर मुलाणी यांनी मला मंडळ अधिकारी कार्यालय भिंगार तहसिल अहिल्यानगर यांनी दिलेल्या जप्ती नोटीसची तारीख मंडळ अधिकारी श्रीमती दळवी यांचेकडुन वाढवुन देण्याकरिता 20,000/-रुपये लाचेची मागणी केली परंतु

सदर चर्चेदरम्यान श्री.मुलाणी यांनी मंडळ अधिकारी श्रीमती दळवी मॅडम यांना फोन करुन स्पिकर ऑन करुन बोलणे केले त्यावेळी त्या कार्यालयात हजर नसुन उद्या ऑफिसला या असे सांगितल्याने त्यांचेसोबत माझे कामासंदर्भाने चर्चा करता आली नाही. त्याबाबत सविस्तर पडताळणी पंचनामा करण्यात आला आहे.

त्यानंतर दिनांक 13/6/2025 रोजी पुन्हा श्री. पैलकर साहेब व टीम अहिल्यानगर येथे आली तेव्हा त्यांनी मला श्री.मुलाणी यांना फोन करुन भेटण्यास कोठे येवु बाबत विचारण्यास सांगितले. तेव्हा मी माझे मोबाईल वरुन श्री.मुलाणी यांना फोन केला तेव्हा ते आज अहिल्यानगर येथे नसुन बाहेरगावी असलेबाबत सांगितले व दुपारनंतर येणार असल्याचे सांगितले. परंतु ते दुपारनंतर देखील आले नसल्याने त्यांची व माझी भेट झाली नसल्याने तसेच दि. 14/6/2025 व दि.15/6/2025 रोजी मंडळ अधिकारी कार्यालयास शासकीय सुट्टी असल्याने उर्वरीत कारवाई ही दि. 16/6/2025 रोजी करण्याबाबत ठरले. त्याबाबत सविस्तर पंचनामा करण्यात आला आहे.

त्यानंतर दि. 16/6/2025 रोजी पुन्हा श्री.पैलकर साहेब व टीम अहिल्यानगर येथे आली तेव्हा त्यांनी मला श्री.मुलाणी यांना फोन करुन भेटण्यास कोठे येवु बाबत विचारण्यास सांगितले. तेव्हा मी माझे मोबाईल वरुन श्री.मुलाणी यांना फोन केला तेव्हा ते औरंगाबाद येथे आले असलेबाबत सांगुन दुपारी येतो व फोन करतो असे सांगितले. त्यानंतर दुपारी श्री.मुलाणी यांचा फोन आला व त्यांनी आज मॅडम आफीसला नसुन मिटीग करिता गेल्या असल्याचे सांगितले व उद्या दि. 17/6/2025 रोजी सकाळी 11/00 ते 12/00 दरम्यान मंडळ अधिकारी यांना भेटु असे सांगितले. त्याबाबत सविस्तर पंचनामा करण्यात आला आहे.

त्यानंतर दिनांक 17/6/2025 रोजी पुन्हा श्री.पैलकर साहेब व टीम यांनी अहिल्यानगर येथे मला श्री.मुलाणी यांना फोन करुन भेटण्यास कोठे येवु बाबत विचारण्यास सांगितले. तेव्हा मी माझे मोबाईल वरुन श्री.मुलाणी यांना फोन केला तेव्हा मुलाणी यांनी ते 10 मिनीटात मंडळ अधिकारी कार्यालयात येत असुन तेथे भेटण्यास बोलविले. त्यावेळी मला व पंच नं.1 श्री.निकम यांना पडताळणी कारवाईकामी आवश्यक सुचना देवनु व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन देवुन अहिल्यानगर येथील भुईकोट किल्ल्याच्या मागील मोकळया जागेतुन सुमारे 10/54 वाजेचे सुमारास माझेकडील दुचाकी वाहनाने रवाना केले. त्यावेळी मंडळ अधिकारी कार्यालयात माझेत तसेच श्री.मुलाणी व मंडळ अधिकारी श्रीमती दळवी मॅडम यांचेत झालेल्या चर्चेदरम्यान दळवी मॅडम यांनी माझेकडे माझे कामाचे संदर्भाने लाचेची मागणी केली नाही. परंतु मी तेथुन बाहेर निघत असतांना श्री.मुलाणी यांनी माझेकडे पैशाची मागणी करुन लवकर घेवुन येणेबाबत सांगितले.त्याबाबत सविस्तर पंचनामा करण्यात आला आहे.

त्यानंतर मला श्री.मुलाणी यांनी पैसे घेवुन लागलीच बोलविले असल्याने मी पैलकर साहेब यांना माझेकडील बचतीमधील 20,000/-रुपये दिले त्यात 500 रुपये दराच्या 34 चलनी नोटा तसेच 200 रुपये दराच्या 15 चलनी नोटांना ॲन्थ्रासिन पावडर लावुन त्यांनी माझेकडे दिल्या. त्यावेळी मला श्री.मुलाणी यांनी फोन करुन माझे घराजवळील रस्त्यावर येण्याबाबत सांगितले. त्यानंतर श्री.पैलकर साहेब यांनी माझेकडे व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन आवश्यक त्या सुचना देवुन 12/22 वाजेचे सुमारास अहिल्यानगर येथील भुईकोट किल्ल्याच्या मागील मोकळया जागेतुन माझेकडील दुचाकी वाहनाने रवाना केले. त्याप्रमाणे मी व पंच श्री.निकम असे श्री.मुलाणी यांना भेटण्याकरिता माझे महेशनगर,

पाथर्डी रोड येथील घराजवळील रस्त्यावर गेलो. त्यावेळी चर्चेदरम्यान सहुरा एजन्सीचे कर्मचारी श्री.जहिर मुलाणी यांनी मागणी केलेले 20,000/-रुपये लाचेची रक्कम ज्यात 500 रुपये दराच्या 34 व 200 रुपये दराच्या 15 चलनी नोटा पंच साक्षीदारासमक्ष माझेकडुन स्विकारले असता त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले असुन सदर कारवाईबाबत सविस्तर सापळापुर्व/यशस्वी सापळा पंचनामा करण्यात आला आहे.

तरी खाजगी इसम श्री. जहिर अहमद इक्बाल मुलाणी, वय 30 वर्षे, व्यवसाय- फायनान्स रिक्व्हरी, सहुरा एंटरप्राईजेस, अहिल्यानगर. रा. एकनाथ नगर, रहेमानिया मस्जीद जवळ, नेप्ती रोड, केडगाव जि. अहिल्यानगर यांनी माझे घराचे जप्तीची तारीख मंडळ अधिकारी कार्यालय, भिंगार तहसिल येथील मंडळ अधिकारी,श्रीमती दळवी मॅडम यांचेकडुन वाढवुन देण्याकरिता श्री.जहिर मुलाणी यांनी त्यांचे मंडळ अधिकारी यांचेसोबतच्या ओळखीचा प्रभाव पाडुन मंडळ अधिकारी यांचे नावाने स्वतःकरिता दिनांक 12/6/2025 रोजी 20,000/- रुपये लाचेची मागणी करुन सदर लाचेची रक्कम दिनांक 17/6/2025 रोजी 12/34 वाजेचे सुमारास पाथर्डी रोड येथील श्रेया सिमेंट एजन्सीचे समोर झाडाखाली पंच साक्षीदारासमक्ष स्विकारली. यावरुन खाजगी इसम श्री. जहिर अहमद इक्बाल मुलाणी, वय 30 वर्षे, व्यवसाय- फायनान्स रिक्व्हरी, सहुरा एंटरप्राईजेस, अहिल्यानगर. रा.एकनाथ नगर, रहेमानिया मस्जीद जवळ, नेप्ती रोड, केडगाव जि अहिल्यानगर यांनी भ्रष्ट व बेकायदेशीर मार्गाने स्वतःसाठी पैशांच्या स्वरुपात लाभ मिळविण्याची व्यवस्था करुन लोकसेवक बरोबरच्या आपल्या ओळखीचा प्रभाव पाडुन गुन्हेगारी स्वरुपाचे वर्तन केल्याने त्यांचेविरुध्द लाचलुचपत प्रतिबंधक कायद्याप्रमाणे माझी कायदेशीर फिर्याद आहे.

माझी वरील फियार्द मी वाचुन पाहिली ती माझे सांगणेप्रमाणे बरोबर टंकलिखीत केलेली आहे.

समक्ष हि फिर्याद दिली

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.**
**(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध दिसून आल्यामुळे):**

(1) **Registered the case and took up the investigation (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** jagdish dipajirao mulgir (पोलीस निरीक्षक) **or (किंवा):**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):** Rank (हुद्दा):

**No. (क्र.):** **to take up the Investigation (तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला): or (किंवा)**

(4) **Transferred to P.S. (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):**

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषणफॉर्म - १)

on point of jurisdiction (अधिकाराच्या दृष्टिकोनातून).

**F.I.R. read over to the complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the complainant /informant, free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली)**

**R.O.A.C. (आर.ओ.ए.सी.)**

पोलीस ठाणे अंमलदार
भिंगार कॅम्प पो.स्टे., अहमदनगर

**Signature of Officer in charge, Police Station (ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची स्वाक्षरी)**

Name (नाव): jagdish dipajirao mulgir

Rank (हुद्दा): I (Inspector)

No. (क्र.):

सुशील सुखबिर सेट

**14. Signature / Thumb impression of the complainant / informant (तक्रारदाराची/खबर देणाऱ्याची सही/अंगठा)**

**15. Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**